International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.2 Nov-Dec 2023

# औंध संस्थानची राज्यघटना आणि साक्षरता चळवळ

**पाटील चंद्रकांत श्रीपती**
संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
**Corresponding Author – पाटील चंद्रकांत श्रीपती**
**DOI- 10.5281/zenodo.10567103**

**प्रस्तावना**

आधुनिक भारताच्या इतिहासात दक्षिणी संस्थाने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अठरा संस्थानांच्या गटातील एक महत्त्वाचे आणि सुधारणावादी संस्थान म्हणून औंध या संस्थानाची ओळख होती. या संस्थानाची स्थापना श्रीमंत परशुराम त्रिंबक किन्हईकर यांनी इ. स. १६९९ मध्ये केली. इ. स. १७०१ मध्ये महाराणी ताराबाई यांनी परशुराम त्रिंबक यांची प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली. त्यानंतर या घराण्याला 'पंतप्रतिनिधी' म्हणून संबोधले जाऊ लागले.[१]

औंध संस्थानात आधुनिकीकरणाची सुरूवात श्रीमंत श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी (इ. स. १८४८ ते १९०१) यांच्या कार्यकाळात सुरू झाली. याच कालखंडात औंध संस्थानात आधुनिक शिक्षणाला सुरूवात होऊन, विविध प्रकारच्या सुधारणा होऊ लागल्या होत्या. त्यांच्यानंतर इ. स. १९०९ मध्ये श्रीमंत भवानराव उर्फ (बाळासाहेब) पंतप्रतिनिधी यांच्या हाती सत्तासूत्रे आली. हे उच्च विद्याविभूषित असे राजे असल्याने औंध संस्थानच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांनी विशेष असे परिश्रम घेतले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजसुधारणा आणि समाजसुधारणेच्या माध्यमातून राज्याचा आणि राष्ट्राचा विकास साधण्यासाठी आपल्या सर्व जनतेला शिक्षण देणे हे त्यांनी आपले परम कर्तव्य मानले. याच माध्यमातून औंध च्या जनतेच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे देण्यासाठी त्यांना प्रथम शिक्षित केले पाहिजे. या जाणिवेतून श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी आपले पुत्र आणि औंध संस्थानच्या ग्रामराज्य व्यवस्थेचा पहिला पंतप्रधान आप्पा पंत यांच्या मदतीने औंध संस्थानच्या जनतेच्या विकासाकरिता निर्माण केलेली राज्यघटना आणि त्यासाठी चालविलेली साक्षरता चळवळ याचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेण्यात आला आहे.[२]

**संशोधनाचा हेतू**

औंध संस्थानातील आपल्या प्रजेच्या विकासाकरिता श्रीमंत भवानराव उर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी जनतेच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे देण्यासाठी ग्रामराज्य व्यवस्था सुरू केली. त्यासाठी राज्यघटना अंमलात आणून, जनतेला शिक्षित करून, राज्यकारभारात सामावून घेण्यासाठी साक्षरता चळवळ सुरू केली त्याचा आढावा प्रस्तुत ठिकाणी घेण्यात आला आहे.

**औंध संस्थानची राज्यघटना (सन १९३९)**

हिंदुस्थानात गांधीवादी राज्यघटनेच्या माध्यमातून ग्रामराज्याचा पहिला प्रयोग औंध संस्थानात इ. स. १९३९ पासून सुरू झाला. दि. १५ नोव्हेंबर १९३८ रोजी श्रीमंत भवानराव पंतप्रतिनिधी यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त आपल्या प्रजेला स्वयंमअधिकार देण्याची मोठी घोषणा केली. त्या घोषणेनुसार राजेसाहेब म्हणतात की, ''आता औंध संस्थानची माझी प्रजा आपला सर्व कारभार स्वत: करण्यास समर्थ आहे यासाठी गेली तीस वर्षे आम्ही त्यांना शिकवून तयार केले आहे. आजपासून राज्याचा सर्व कारभार लोकांच्या हातात देऊन आम्ही, लोक आपले कर्तव्य कर्म कसे करतात, हे स्वस्थ बसून पाहाणार आहोत.

लोकांनी आपले प्रतिनिधी कसे निवडावे व ग्रामराज्याचा स्वयंपूर्ण कारभार करावा याचे नियम वगैरे योग्य सल्ला घेऊन लवकरच जाहीर केले जातील.''[३] या राजे साहेबांच्या घोषणेनुसार इ. स. १९३८ मध्ये स्वत: महात्मा गांधीजींनी ही घटना वाचून दुरूस्त करून दिली. त्यानुसार म. गांधीजींच्या मते, या ग्रामराज्याच्या प्रयोगात मताधिकार ही एक मोठी जबाबदारी आहे. ही जबाबदारी काही तपश्चर्या शिवाय फुकट मिळाली तर त्याची किंमत वाटत नाही. फुकट मिळालेले वाया जाते व समाजात जबाबदारीची जाणीव कमी होते. समाजाचा ऱ्हास होतो त्यामुळे ''औंधात प्रत्येक फक्त साक्षर प्रौढ स्त्री–पुरूषांनाच मत देण्याचा अधिकार राहील!''[४] असे मत स्पष्ट केले. दि. २१ जानेवारी १९३९ रोजी औंध च्या राजाने आपल्या प्रजेला ही राज्यघटना बहाल केली. या घटनेनुसार औंध संस्थानात विकेंद्रित लोकशाहीचा कल्याणकारी मार्ग अवलंबून जनतेच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे दिली. त्यानंतर या घटनेनुसार शिक्षण क्षेत्रात ही महत्त्वपूर्ण असे बदल केले. ते पुढीलप्रमाणे:

१) प्राथमिक शिक्षण सर्वांना मोफत आणि अनिवार्य केले.
२) राज्यकारभार सहभागासाठी साक्षरता आणि मताधिकार यांचा सहसंबंध जोडून साक्षरतेची अट घालण्यात आली.
३) हा कायदा अंमलात आल्यानंतर संस्थानातील सर्व निरक्षरता दूर करण्याच्या हेतूने संस्थानातील प्रत्येक स्त्री–पुरूषास मतदानाची योग्यता प्राप्त करून देण्यासाठी त्यांना साक्षर करण्याची योग्य ती जबाबदारी सरकार एका वर्षात पूर्ण करेल याची हमी दिली.
४) कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवारांची पात्रता ही औंध संस्थानचा रहिवाशी आणि अठरा वर्षे पूर्ण झालेला साक्षर व्यक्ती असेल अशी होती.
५) ग्रामपंचायतीच्या सदस्यांची निवड गावातील साक्षर प्रौढ लोकांच्या मताधिक्याने होईल.
६) गावच्या शिक्षणाची व्यवस्था आणि इतर सुधारणा ह्या या नवनियुक्त लोकप्रतिनिधीमार्फत करण्यात येतील.[६]

औंध संस्थानच्या विकासासाठी आणि ग्रामराज्याचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी अशा प्रकारच्या तरतूदी या राज्यघटनेमार्फत करण्यात आल्या होत्या.

**साक्षरता चळवळ**

औंध संस्थानात महात्मा गांधींजींच्या स्वप्नातील विकेंद्रित लोकशाहीचा कल्याणकारी मार्ग अवलंबून श्रीमंत भवानराव पंतप्रतिनिधी यांनी जनतेच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे दिली. या नवीन घटनेनुसार जनतेला राज्यकारभारात सहभागी होण्यासाठी प्रौढ साक्षरतेची अट घालण्यात आली होती. त्यासाठी साक्षरता मोहिम कशी सुरू करावयाची आणि या कामाची जबाबदारी कोणाकोणावर सोपवायची यासाठी श्रीनिवासराव हायस्कूल मध्ये एक सभा घेतली गेली. या सभेमध्ये श्रीमंत आप्पा पंत, धोंडोपंत मास्तर, गजानन

मास्तर, पाठक मास्तर आणि संस्थानातील इतर प्रशासकीय अधिकारी हजर होते. अंतिम चर्चेअंती औंध संस्थानातील सर्व शाळांना तीन महिने सुट्टी देऊन, या कामाकरिता सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि सर्व शिक्षित व्यक्ती यांना या कार्यक्रमात सामील करून घेऊन प्रत्येकाने पाच निरक्षर प्रौढांना साक्षर करण्याचे निश्चित केले. या साक्षरता मोहिमेसाठी लागणारी उपकरणे, प्रवास व्यवस्था आणि राहाणे व जेवणाची व्यवस्था संस्थानामार्फत करण्याचे ठरले. यासाठी साक्षर करण्याची पद्धत कोणती वापरावी यावरती चर्चा करून श्री. आप्पासाहेब भागवत यांचेकडून सर्व प्रशिक्षणार्थींना साक्षरता वर्गाचे प्रशिक्षण देऊन, साक्षरतेबरोबरच एक सुसंस्कृत, समाधानी, सेवाभावी आणि स्वावलंबी समाज कसा निर्माण करता येईल याचेही शिक्षण देण्यात येत होते.[७] औंध मधील या साक्षरता चळवळीचा उद्देश फक्त लोकांना अक्षर ज्ञान ओळखण्यापुरता मर्यादित नसून, मानवी जीवनाशी संबंधित विविध विषयाचा अभ्यास करण्याची गोडी लोकांच्या ठिकाणी निर्माण झाली पाहिजे हा उद्देश होता. अज्ञान आणि दारिद्र्य हे गुण मुख्यत: खेड्यामध्ये जास्त प्रमाणात आढळतात त्यासाठी प्रथम खेड्यातील लोकांना शिक्षणाचे धडे देऊन, त्यांना साक्षर करून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणि राज्यकारभारात सामील करून घेणे हा या घटनेचा मुख्य उद्देश होता. यासाठी अठरा वर्षे पूर्ण झालेल्या सर्व स्त्री–पुरूषांना साक्षर करण्याचा औंध संस्थानाने निर्धार केला होता.[८] औंध संस्थानातील शाळांना तीन महिने सुट्टी देऊन, सर्वांच्याच वाट्याला एक अद्वितीय नवा अनुभव आला होता. एक वेगळे चैतन्य आणि उत्साह सर्व औंधच्या खेड्यापाड्यात व झाडाझोपडीतून उफाळू लागला होता. संस्थानातील सर्व मुले–मुली, राजपुत्र–राजकन्या, मास्तर, पोलिस, अधिकारी, कारकून हे सर्व लोक आपापल्या घराबाहेर पडून सर्व निरक्षर लोकांना साक्षर करण्याचे धडे देऊ लागले होते. ही चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी कथा, कीर्तने, व्याख्याने, मिरवणुका, मॅजिक लॅन्टर्न, स्लाईडस्, नकाशे, चित्रे यांच्या सर्रास उपयोगाने शिकणाऱ्यामध्येही उत्साह निर्माण झाला होता. आपण का शिकतो? ही काय सर्व भानगड आहे? आपल्यामागे ही सर्व मुले का लाभली आहेत हे नकळत सुद्धा संस्थानातील सर्व स्त्री–पुरूष, वयोवृद्ध मंडळी साक्षरतेचे पाठ गिरवू लागली होती. सर्वजण एक नवा अनुभव अनुभवू लागली होती.[९]

औंध च्या या साक्षरता चळवळीत संस्थानाबाहेरील अनेक नेते, कार्यकर्ते आकर्षित होऊन या ज्ञान–यज्ञान सामील झाले होते. त्यामध्ये विशेषत: रावसाहेब पटवर्धन यांनी गावोगावी जाऊन साक्षरता कार्याची तपासणी करून, लोकशाही, लोकांची कर्तव्य, स्वातंत्र्य लढा इत्यादी बाबत लोकांना व्याख्याने देऊन त्यांच्यात जागरूकता आणण्याचे कार्य केले. भाऊ धर्माधिकारी व नाना धर्माधिकारी यांनी शिक्षण शिबिरे खोलून लोकांना साक्षर करण्याचे काम केले. जानेवारी १९३९ ते ऑगस्ट १९४२ या काळात शंकरराव देव, आचार्य भागवत व आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी संस्थानातील अनेक खेड्यांना भेटी देऊन लोकांना लोकशिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्याशिवाय यामध्ये सर्वांत महत्त्वाचे म्हणजे औंधच्या विकासात स्वत:ला जुंपून घेणारे तात्यासाहेब शिखरे हे वर्षातून दोन–तीन महिने औंध मध्ये मुक्काम करून, शिक्षणाचे वर्ग काढणे, ग्रामोद्योग–ग्रामोद्धाराची शिबिरे काढणे आणि हिंदुस्थानातील वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेक कार्यकर्त्यांना आणून औंध संस्थानातील लोकशिक्षणाच्या कार्यास त्यांना लावणे ही सर्व कामे तात्यासाहेब शिखरे यांनी केली होती. त्याचबरोबर अनेक गांधीवादी कार्यकर्त्यांनी या लोकशिक्षणाच्या कार्यात सहभागी होऊन आपली कामगिरी उत्तम प्रकारे बजावली होती.[१०] त्यामुळे या काळात औंध संस्थानातील साक्षरता कार्यास गती येऊन साक्षरता वाढ होण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली होती. औंध संस्थानातील अठरा वर्षे पूर्ण झालेल्या सर्व स्त्री–पुरूषांना मतदानाचा अधिकार देऊन त्यांना राज्यकारभारात सहभागी करण्यात आले. त्यासाठी साक्षरतेचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार सुरूवातीस मामलेदार यांचेकडे होता. त्यानंतर शिक्षण विभागाचे संचालक आणि उच्च माध्यमिक शाळामधील पदवीधर शिक्षकांना देण्यात आला होता.[११]

अशा प्रकारे औंध संस्थानात ग्राम राज्याच्या यशस्वी प्रयोगासाठी पद्धतशीरपणे साक्षरता चळवळ राबवून ती यशस्वी केली होती.

**निष्कर्ष**

औंध चे अधिपती श्रीमंत भवानराव उर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचेवर महात्मा गांधीजींच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. आपल्या प्रजेच्या कल्याणार्थ त्यांना स्वयंशासनाचा अधिकार देण्यासाठी राजेसाहेबांनी आपल्या प्रजेला राज्यघटना बहाल केली. जी राज्यघटना स्वत: महात्मा गांधीजी आणि पंडित नेहरू यांनी दुरूस्त करून दिली होती. या घटनेच्या माध्यमातून हिंदुस्थानात पहिल्यांदाच औंध संस्थानात गांधीजांच्या स्वप्नातील ग्रामराज्याचा प्रयोग सुरू झाला होता. त्यासाठी जनतेला राज्यकारभारात सामावून घेण्यासाठी गांधीजींच्या मतानुसारच साक्षरतेची अट घालण्यात आली होती. त्यासाठी श्रीमंत राजेसाहेब आणि आप्पा पंत यांनी सर्व सरकारी यंत्रणा कामाला लावून आपल्या प्रजेला एक वर्षामध्ये साक्षर करण्याचा निर्धार केला होता.

औंध मधील साक्षरता चळवळ यशस्वी करण्यासाठी संस्थानाबरोबर संस्थानाबाहेरील व्यक्तींनी ही मोठ्या प्रमाणात मदत केल्याचे दिसून येते. त्यामध्ये विशेषत: रावसाहेब पटवर्धन, धर्माधिकारी बंधु, शंकरराव देव, आचार्य भागवत, आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे आणि तात्यासाहेब शिखरे इत्यादी मंडळींनी गावोगावी व्याख्याने देऊन, शिक्षण शिबिरे सुरू करून लोकांना साक्षरतेचे (शिक्षणाचे) महत्त्व, लोकशाहीचे महत्त्व, लोकांचे कर्तव्य आणि भारतीय स्वातंत्र्य लढा यांचे महत्त्व समजावून सांगून लोकांच्यात एक नवचैतन्य आणि जागृती आणण्याचे कार्य या साक्षरता चळवळीच्या माध्यमातून करण्यात आलेले दिसून येते. म्हणूनच पुढील काळात औंध संस्थानातील सर्व स्त्री–पुरूष यांच्या साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळातील औंध संस्थानात सुरू झालेल्या लोकशाही मूल्यावर आधारित ग्रामराज्याचा प्रयोग आणि साक्षरता चळवळ यशस्वी झालेचे दिसून येते.

**संदर्भ साधने**

1. पोतनीस सुनीत, बखर संस्थानांची, राजहंस प्रकाशन पुणे–२००७, पृ. ५५.
2. बॅ. आप्पा पंत, मुलुखावेगळा राजा, मानसन्मान प्रकाशन पुणे, ऑगस्ट १९८६, पृ. ५६.
3. कित्ता, पृ. ३७.
4. कित्ता, पृ. ४६.
5. The Aundh State Constitution-1939, (A Press Note), Page No. 2
6. औंध स्टेट गॅझेट (जादा अंक), औंध, दि. ३१ डिसेंबर १९३८, (भाग–१), पृ. २ व ४.
7. बॅ. आप्पा पंत, उपरोक्त, पृ. ५१.
8. Self-Governing Aundh, Report of the Chapekar Committee, the Local Self Government Institute Bombay-1947, Page No. 48.
9. बॅ. आप्पा पंत, उपरोक्त, पृ. ५३.
10. कित्ता, पृ. ५४.
11. Self-Governing Aundh, Report of the Chapekar Committee, Opcit Page No. 29.